# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/10/2022 (मंगळवार)


---

### बॅकेंतून पैसे काढणा-या नागरीकांवर पाळत ठेवुन त्यांच्याकडे चोरी व लुटमार करण्या-या अट्टल गुन्हेगारांच्या आंतरराजीय टोळीला केले जेरबंद

**(स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कार्यवाही)**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक दि.२२/१०/२०२२ रोजी पोलीस ठाणे रामटेक येथील अप.क्र. ६०९/२२ कलम ३७९,३९२,३४ भादवि च्या जबरीच्या गुन्हयातील आरोपी शोध संबंधाने नागपुर ग्रामिण हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना रामटेक येथे दाखल गुन्हयात चेक केलेले CCTV फुटेज मध्ये दिसणारे संशयीत आरोपी हे मोटर सायकलने पोलीस ठाणे कन्हान हद्दीतील तारसा चौक परिसरात फिरत असल्याचे गुप्त माहीती प्राप्त झाली. त्यानुसार स्थागुशाचे पथकाने तारसा चौक येथे जावून शहानिशा केली असता चार इसम हे मोटर सायकल क्र. MH 19 DE-3313 आणि MH 28 AH-2799 ने संशयीतरित्या फिरत असतांना आढळून आले. पोलीसांना पाहुन सदरचे संशयीत इसम पळुन जावु लागले. त्यांचा पाठलाग करुन ३ इसमांना पकडण्यात आले. त्यांचेपैकी एक इसम अंधाराचा फायदा घेवून पळुन गेला. मिळुन आलेले इसम नामे **१) राजेश पवलु गोटेटी, वय ३५ वर्ष, २) राजु प्रभाकर सिंगमसेट्टी, वय ३९ वर्ष, ३) अनिल बद्री पेटला, वय २२ वर्ष, तिनही रा. तिप्पा, मंडल-बोगोल, ता. कावली जि. नेल्लोर राज्य आंध्रप्रदेश** अशी आरोपीतांची नावे असून पळुन जाणारा इसम **४) विक्रम सामील सल्ला वय ३० वर्ष,रा. तिप्पा, मंडल-बोगोल, ता.कावली जि. नेल्लोर राज्य आंध्रप्रदेश** हा असल्याची माहिती मिळाली. या तिनही आरोपींनी दि. १७/१०/२०२२ रोजी रामटेक येथील स्टेट बॅक ऑफ इंडीया येथे एका इसमावर पाळत ठेवली व तो इसम बॅकेतून पैसे विड्रॉल करुन नगदी २,००,०००/- रुपयांची रक्कम एका बॅग मध्ये ठेवुन बाहेर येवुन पुढील कामाकरीता नजीकच्या पोस्ट ऑफीस मध्ये जात असतांना यातील आरोपीतांनी संगणमत करुन त्या इसमाच्या हातातुन पैशाची बॅग जबरीने हिसकावुन नेली. मिळालेल्या तिनही आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता त्यांनी यापुर्वी **सन २०२१ मध्ये व सन २०२२** मध्ये रामटेक, सावनेर, कन्हान, मौदा, भंडारा, तुमसर, जळगाव, पातुर (अकोला), वरूड (अमरावती) तसेच मध्य प्रदेश येथील पांढुर्णा, सौंसर आणि कोतवाली, जि.छिंदवाडा(मध्यप्रदेश) परिसरात मोटर सायकलने चोरी व लुटमारीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. मागील काही महिण्यापासुन चोरी व लुटमार करण्यासाठी आरोपीतांनी बुलढाणा व जळगांव परिसरातील होंडा ट्रिगर व होंडा युनिकॉर्न या २ मोटार सायकल ची चोरी करुन त्या मोटार सायकलने चोरी व लुटमारीचे गुन्हे केल्याचे सांगीतले. वरील नमुद आरोपीतांकडुन **नागपूर ग्रामीण हद्दीतील ६ गुन्हयासह महाराष्ट्रातील व मध्यप्रदेशातील एकुण १५ चोरी व लुटमारीचे** गुन्हे उघडकीस आले असुन या सर्व आरोपीतांनी खालील नमुद पोलीस स्टेशन अंतर्गत गुन्हे केल्याचे उघड झाले आहे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | अप.क्र.व कलम |
|---|---|---|
| १ | पोलीस स्टेशन रामटेक, नागपूर ग्रामीण | ६०९/२२ कलम ३७९,३९२,३४ भादवि, |
| २ | पोलीस स्टेशन सावनेर, नागपूर ग्रामीण | ८०४/२१ कलम ३७९ भादवि |
| ३ | पोलीस स्टेशन कन्हान, नागपूर ग्रामीण | १५९/२१ कलम ३७९ भादवि |
| ४ | पोलीस स्टेशन मौदा, नागपूर ग्रामीण | ३४०/२२ कलम ३७९ भादवि |
| ५ | पोलीस स्टेशन सावनेर, नागपूर ग्रामीण | ८०६/२२ कलम ३७९ भादवि |
| ६ | पोलीस स्टेशन सावनेर, नागपूर ग्रामीण | ३०२/२२ कलम ३७९ भादवि |
| ७ | पो.स्टे. वरूड जि. अमरावती, | ७६७/२२ कलम ३७९ भादवि, |
| ८ | पो.स्टे. पातुर जि. अकोला | ३१२/२२ कलम ४२० भादवि |
| ९ | पो.स्टे. भंडारा जि.भंडारा | ४४९/२२ कलम ३७९ भादवि, |

| | | |
|---|---|---|
| १० | पो.स्टे. तुमसर जि. भंडारा | ४१२/२२ कलम ३७९ भादवि, |
| ११ | पो.स्टे. फैजपुर जि. जळगाव | १७९/२२ कलम ३९२ भादवि, |
| १२ | पो.स्टे. जळगाव शहर जि.जळगांव | ३१०/२२ कलम ३७९,३४ भादवि, |
| १३ | पो.स्टे. कोतवाली जि.छिंदवाडा (मध्यप्रदेश) | ४७३/२२ कलम ३७९ भादवि, |
| १४ | पो.स्टे. सौसर जि.छिंदवाडा (मध्यप्रदेश) | २९८/२२ कलम ३७९ भादवि, |
| १५ | पो.स्टे. पांढुर्णा जि.छिंदवाडा, (मध्यप्रदेश) | ४०२/२२ कलम ३९२ भादवि |

वरील नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन चोरी व लुटमारीच्या गुन्हयातील नगदी १,०६,९००/—रू, तिन मोबाईल संच किं. ४२,०००/— रू. तसेच गुन्हे करते वेळी वापरलेल्या चोरीच्या दोन मोटर सायकली किं. १,१०,०००/—रू. असा **एकुण किं. २,५८,९००/—रू** चा माल जप्त करण्यात आला आहे. व पुढील कायदेशीर प्रक्रीयेकरीता पोलीस स्टेशन रामटेक, नागपूर ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आले.

वरील आरोपी हे गुन्हे करतांना विशेषतः बॅकेमधून मोठया रक्कमा विड्रॉल करणाऱ्या एकटया असणाऱ्या नागरिकांवर पाळत ठेवून त्यांना आपले लक्ष बनवित होते. नगदी रक्कम घेवुन बॅकेच्या बाहेर येताच त्यांचे लक्ष विचलीत करुन त्यांना गाफील ठेवत असे व त्यानंतर संधी साधून नागरिकां जवळील पैशांची चोरी करीत होते. अशा वेळी सहजरित्या चोरी करणे शक्य न झाल्यास बॅकेतुन पैसे घेवुन निघणा—या नागरिकांचा बॅकेपासून काही अंतरापर्यंत पाठलाग करुन त्यांच्याकडील पैसे जबरीने हिसकावुन मोटरसायकलने पळून जायचे. अशा पध्दतीचे गुन्हे करीत असतांना पोलीस मोबाईल कॉल डिटेल्सची माहिती काढून आरोपीतांचा मागोवा घेत असतात याची या आरोपीतांना चांगलीच जाणीव असल्याने सर्व आरोपी हे गुन्हा करतांना मोबाईल फोनव्दारे कॉल न करता मोबाईल फोनच्या माध्यमातुन फेसबुक मॅसेंजरचा उपयोग करुन एकमेकांचे संपर्कात राहत असत.

सदरची कामगिरी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक, श्री राहुल माकणिकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.ओमप्रकाश कोकाटे, सहा.पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेन्द्र चौधरी, दिनेश आधापूरे, राजेंद्र रेवतकर, पोलीस नायक रोहन डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ, शैलेष यादव, सतिष राठोड, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे यांचे पथकाने केली.



# गांजा तस्करी करणारे अंतरराज्यीय आरोपी ४३ किलो गांजासह गजाआड

## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक २४/१०/२०२२ रोजी पेट्रोलींग दरम्यान स्थानिक गुन्हे ाखा नागपुर ग्रामिणचे पथकास गोपनिय माहीती प्राप्त झाली की अवैधरित्या गुंगीकारक वनस्पती अंमली पदार्थ गांजा भरून असलेली ग्रे रंगाची मारूती स्विफ्ट कार क्र. जै.१५.छ.९१७५ हैदराबाद कडुन नागपुर चे दिशेने येत आहे. अशा माहीती वरून सदरचे पथकाने पोलीस ठाणे बुटीबोरी परिसरात सापळा रचुन खालसा ढाबा येथे सदर कार थांबवुन कारची झडती घेतली असता कारचे डिक्की मध्ये एकुण ४३.२०० कि.ग्रॅ. गुंगीकारक वनस्पती गांजा मिळुन आल्याने कार मधील एकुण पाच आरोपी १) प्रशांत सुनिल मडोरी, वय २३ वर्ष, रा. पारडपल्ली थाना पिटलमकुपा ता. बासोडा, जि. कामारेड्डी, २) राजु रामलु झिनका, वय २१ वर्ष, रा. कल्लेर, ता. नारायणकेड जि. संघरेड्डी, ३) एकनाथ सुनिल मडोरी, वय २५ वर्ष, रा. पारडपल्ली थाना पिटलमकुपा ता. बासोडा, जि. कामारेड्डी, ४) नविन काशीराम कत्तीगामा, वय २६ वर्ष, रा. पारडपल्ली थाना पिटलमकुपा ता. बासोडा, जि. कामारेड्डी, ५) गणेश किशन केतावार, वय २५ वर्ष, रा. पारडपल्ली थाना पिटलमकुपा ता. बासोडा, जि. कामारेड्डी यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ४३.२०० कि.ग्रॅ. अंमली पदार्थ गांजा किं. ४,३२,०००/—रू, पाच मोबाईल संच किं. ४६,०००/—रू व स्विफ्ट कार किं. ७,००,०००/—रू असा एकुण ११,७८,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपींना जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे बुटीबोरी यांचे ताब्यात देवुन आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे बुटीबोरी येथे अप.क्र. ६४९/२२ कलम २०,२२,२९ NDPS Act अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस सपोनि अनिल राउत, हवालदार विनोद काळे, ज्ञानेश्वर राउत, मदन आसतकर, नापोशि मयुर ढेकळे, सत्यशील कोठारे, अमृत किनगे, प्रणय बनाफर, विपीन गायधने, अजिज शेख, चापोना मुकेश शुक्ला तसेच सायबर सेलचे सतिष राठोड यांचे पथकाने केली.



## चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत महात्माफुले वार्ड रामटेक येथे दिनांक २३/१०/२०२२ चे १०.०० वा. ते १६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— श्रीमती सकुंतला शामराव वैद्य, वय ६५ वर्ष, रा. महात्मा फुले वार्ड रामटेक या कामावर गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींचे रूमच्या दाराची साखळी उघडुन फिर्यादीचे पलंगावरील उशीखाली ठेवलेली पर्स मधील २०,०००/—रू. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो. नं. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील पाचगाव रिठा मानापुर येथे दिनांक २३/१०/२०२२ चे १९.०० वा. ते दिनांक २४/१०/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शंशाक निलकंठ तुरक, वय ४६ वर्ष, रा. राजाजी वार्ड, रामटेक याने आपल्या शेताचे बाजुचे नहराचे पाण्याची लहान मायनर वर लावलेली २ हॉस्पावरची औषनवेल कंपनीची मोटार पंप किमत ७,०००/—रु., रविंद्र काबळे यांची २ हॉस्पावरची सार्क कंपनीची मोटारपंप किमत ४,०००/—रु. व विवेक तुरक यांची २ हॉस्पावरची औषनवेल कंपनीची मोटार पंप किमत ७,०००/—रु. असा एकुण कि. १८,०००/—रूपयची मोटार पंप अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक योगेश भुरे मो. नं. ७७२२००३६७३ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा एन.एच ५३ महामागा खापरी बारोकर शिवार येथे दिनांक २३/१०/२२ चे १७.१५ ते १८.०० वा. सुमारास एम.एच— ४९/बीयू—२३७४ क्रमांकाचा युनिकॉनचा चालक/मृतक नामे— संदिप बंडूजी डिग्रसे, वय ३४ वर्ष, रा.साई नगर शांती नगर, नागपूर हा फिर्यादी नामे— महादेव धोंडबा डोंगरे वय ५२ वर्ष रा.सेलगाव लवणे ता.कारंजा जि.वर्धा यांच्या घरी काही कामानिमीत्य आला व काम आटपून फिर्यादी यांच्या घरून आपल्या युनिकॉन मोटरसायकलने नागपूर येथे निघाला व नागपूर कडे भरधाव वेगानी जातांनी एन.एच ५३ महामार्ग खापरी बारोकर शिवारात त्याचे एम.एच— ४९/बीयू—२३७४ क्रमांकाच्या युनिकॉन मोटरसायकल वरून स्वत:चे नियंत्रण सुटल्याने एन.एच हायवे रोडवर अपघात होवून गंभीर जखमी होउन स्वत: मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि ढगे मो.नं ९५१८९७९४९९ हे करीत आहे.

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत धन्यवाद गेट कन्हान येथे दिनांक २४/१०/२०२२ चे ०२:०० वा. ते ०२:३० वा. दरम्यान सरतर्फे फिर्यादी पोलीस नाईक मंगेश सोनटक्के पोस्टे. कन्हान हे पेट्रोलींग करीत असतांना फिर्यादीस मिळालेल्या माहीती माहीतीवरून घटनास्थळी जावुन पाहीले असता दोन इसम फिरतांनी दिसले. त्यांना थांबवुन विचापुस केली असता आणि अंगझडती घेतली असता आरोपी नामे— सोपान ठाकरे याच्या कंबरेच्या डाव्या बाजुस एक स्टील चे पाते व लाकडी मुठ असलेले चाकु कि. १,०००/—रू. मिळुन आला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोना मंगेश सोनटक्के पोस्टे. कन्हान, यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जयलाल सहारे मो. क्र. ९३०९९६६३९२ हे करीत आहेत.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत कस्तुरबा हॉस्पीटल सेवाग्राम आसोला सावंगी येथे दि. १५/१०/२२ चे ०४.३० वा. चे सुमारास **राष्ट्रपाल अशोक पोधारे(मृतक), वय २७ वर्ष, रा. सावंगी आसोला ता. हिंगणा जि. नागपुर** हा दि १२/१०/२०२२ रोजी रात्री ०८.०० वा. उलटी करीत असता वडील अशोक लक्ष्मण पोधारे, वय ६३ वर्ष यांनी त्यास 'उलटी का करत आहे' असे विचारले असता त्याने सांगीतले की, 'मी ऑनलाईन मोबाईल वरून जुगार खेळुन ६० ते ७० हजार हारलो' म्हणुन मी उदीर मारण्याची पेस्ट खाली आहे.' त्याची प्रकृत्ती खराब झाल्याने त्यास उपचाराकामी दवाखाना सेलु येथे प्राथमीक उपचार करून कस्तुरबा हॉस्पीटल सेवाग्राम येथे दि. १२/१०/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. सेवाग्राम येथे भर्ती केले असता दि १५/१०/२०२२ रोजी ०४.३० वा मरण पावला. त्या बाबत चे कागदपत्रे पोस्टे बुटीबोरी येथे प्राप्त झाल्याने डॉक्टरी रिपोर्ट वरून प्राप्त कागदपत्रावरून सदरचा मर्ग तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा प्रकाश किशोर फुटाने मेडीकल कॉलेज सेवाग्राम यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरगांबादे मो.क्र. ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर